**ग्रामपंचायतीमध्ये झालेल्या गैरव्यवहारास सरपंच व उपसरपंच जबाबदार असल्यास अनुसरावयाची कार्यपद्धती.**

363

**महाराष्ट्र शासन**
ग्राम विकास व जलसंधारण विभाग
शासन परिपत्रक क्र:व्हिपीएम-२०१३/प्र.क्र.१३७/पंरा-३.
बांधकाम भवन, २५ , मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई-४०० ००१.
दिनांक:- १२ जून, २०१३

**वाचा:-** १. शासन परिपत्रक क्र.पंरासा-२००५/प्र.क्र.२६२/पंरा-३, दि. ३.९.२००५.
२. शासन परिपत्रक क्र.व्हीपीएम-२०१०/प्र.क्र.२७३/पंरा-३, दि.१८.६.२०११.

**प्रस्तावना :-**

शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, ग्रामपंचायतीतील आर्थिक गैरव्यवहारास/ग्रामपंचायत मालमत्ता तथा निधीच्या अपहारास जबाबदार असणारे सरपंच/उपसरपंच/सदस्य/ग्रामसेवक यांच्याकडून अपहारित रक्कम वसूल झाल्यावर अन्य कारवाई करताना टाळाटाळ होते. अशा अपचारी सरपंच/उपसरपंच/सदस्य/ग्रामसेवक यांचा कार्यकाल संपल्याने पुढील कार्यवाही केली नसल्याचे अहवालात नमूद केले जाते. ही बाब अत्यंत गैर आहे. वास्तविक ग्रामपंचायतीच्या व्यवहारात अनियमितता/निधी अपहार तसेच ग्रामपंचायतीतील मूळ दस्तऐवजामध्ये खोटया बनावट कागदपत्रांचा समावेश करणे किंवा फेरफार करणे हा आर्थिक गुन्हा असून अशा गुन्हयास जबाबदार असणा-या व्यक्तीविरूध्द कठोर कारवाई करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने ग्रामपंचायतीच्या आर्थिक व्यवहारात अधिकाअधिक पारदर्शकता आणण्यासाठी शासन खालील निदेश पुन्हा देत आहे.

**शासन परिपत्रक:-**

विधीमंडळाच्या पंचायत राज समितीने शासनाच्या निदर्शनास आणल्यानुसार ग्रामपंचायतीमधील आर्थिक गैरव्यवहारास, ग्रामपंचायत मालमत्ता तथा निधीच्या अपहारास जबाबदार असल्याने सरपंच, उपसरपंच ग्रामपंचायतीच्या सचिव, ग्रामपंचायतीचे कर्मचारी आणि इतर संबंधित व्यक्ती यांच्याकडून अपहारीत मालमत्ता/रक्कम वसुली बरोबरच त्यांच्याविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल

RDTA/H 901(900-6-2013)

करण्याची कार्यवाहीसुध्दा तातडीने करण्याच्या सूचना शासन परिपत्रक दिनांक ३.९.२००५ नुसार देण्यात आलेल्या आहेत. तथापि ग्रामपंचायतीच्या आर्थिक व्यवहारात अनियमितता करणे अथवा ग्रामपंचायत मालमत्तेचा अथवा निधीचा अपहार करणे तसेच ग्रामपंचायतीतील मूळ दस्तऐवजामध्ये खोटया बनावट कागदपत्रांचा समावेश करणे किंवा फेरफार करणे याकरिता जबाबदार असल्यास सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायतीचे सचिव, ग्रामसचिव, ग्रामपंचायत कर्मचारी आणि इतर संबंधित कर्मचाऱ्यांविरोधात आर्थिक गुन्हयासंबंधी फौजदारी खटला दाखल करण्यात येत नसल्याची बाब शासनाच्या वारंवार निदर्शनास येत आहे. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम ३९ अनुसार फक्त अशा प्रकरणात कार्यवाही करण्यात येऊन पुढील कार्यवाही करण्यात येत नसल्याचे उघडकीला आले आहे. याबाबत गांभीर्याने विचार करुन कलम ३९ नुसार कार्यवाही केल्यानंतरही फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबत पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत:-

१) ग्रामपंचायतीच्या आर्थिक व्यवहारात अनियमितता करणे अथवा ग्रामपंचायत मालमत्तेचा अथवा निधीचा अपहार करणे तसेच ग्रामपंचायतीतील मूळ दस्तऐवजामध्ये खोटया बनावट कागदपत्रांचा समावेश करणे किंवा फेरफार करणे हा गुन्हा असल्याने या गुन्हयास जबाबदार असणाऱ्या संबंधित सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायतीचे सचिव, ग्रामसचिव, ग्रामपंचायत कर्मचारी यांच्याविरुध्द फौजदारी गुन्हा तात्काळ दाखल करण्यात यावा.

२) संबंधित पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्यांनी असे गुन्हे नोंदवून घेण्यास टाळाटाळ न करता ते तात्काळ नोंदवून घेण्यात यावेत.

३) ग्रामपंचायत निधीच्या अपहाराबाबत जबाबदार असणाऱ्या व्यक्तीविरोधात ठोस कारवाई करण्यासंदर्भात दिरंगाई करणाऱ्या अथवा निष्काळजीपणा करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द नियमानुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात यावी.

४) ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायतीचे सचिव, ग्रामसचिव, ग्रामपंचायत कर्मचारी आणि इतर संबंधित कर्मचाऱ्यांची मुदत समाप्तीपूर्वी किंवा समाप्तीनंतर त्यांनी केलेल्या अपहाराबाबतच्या रक्कमेची वसूली करण्यात येते परंतू त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल न केल्यामूळे ते निर्दोष सुटतात व त्यामुळे ग्रामपंचायतीच्या निधीचा अपहार करण्याच्या प्रवृत्तीत सुधारणा होण्याऐवजी त्याला खतपाणीच मिळून भ्रष्टाचार वाढतच आहे. त्यामुळे वर सूचित केल्यनुसार फौजदारी गुन्हा दाखल करावा.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद(सर्व) यांनी सदरहू सूचनांचे काटेकोरपणे पालन

365

करण्याबाबत आपल्या जिल्ह्यातील सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांना आवश्यक त्या सूचना दयाव्यात. तसेच अशा प्रकरणांचा मासिक आढावा घेवून त्याबाबतचा अहवाल शासनास वेळोवेळी पाठवावा.

सदर परिपत्रक शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

( शि.फ.लांडगे)

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.

२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.

३) मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.

४) मा.मंत्री, ग्रामविकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.

५) मा.राज्यमंत्री, ग्रामविकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.

६) सर्व मा.विधानसभा/विधानपरिषदेचे सदस्य

७) सर्व विभागीय आयुक्त

८) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी

९) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,

१०)सर्व जिल्हा परिषदांचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)

११)सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,

१२) सर्व जिल्हा पोलिस अधिक्षक

१३) सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती

१४) कक्ष अधिकारी, गृह विभाग (समन्वय) यांना विनंती करण्यात येते की, सर्व पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांचे निदर्शनास सदर परिपत्रक आणण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी.

१५)सर्व मंत्रालयीन विभाग

१६)ग्राम विकास व जलसंधारण विभागातील सर्व पर्यवेक्षकीय अधिकारी व कार्यासन अधिकारी.

१७) निवड नस्ती-कार्यासन पंरा-३

***********************************